# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : १९/०५/२०२३

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

केंद्र व राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने उल्हासनगर शहारात सुरु असलेली समग्र शिक्षा योजना सन २००४ सालापासुन दिव्यांग मुलांकरिता कार्यरत आहे. सदर योजनेमध्ये शाळेतील, शाळाबाहय, अंगणवाडी सेविका, माध्यमिक व प्राथमिक विद्यार्थ्यांकरिता वयोगट ० ते १८ वर्षापर्यंत यांचे संगोपन, वैद्यकीय तपासणी, शैक्षणिक सेवा, थेरेपी सेवा इत्यादी असे विविध उपक्रम उल्हासनगर शहरात सुरु आहे. त्या अनुषंगाने मा. आयुक्त तथा प्रशासक सो. यांच्या आदेशान्वये व मार्गदर्शनाने उल्हासनगर महानगरपालिका महासभागृह जी.बी हॉल येथे दिनांक १८ मे २०२३ रोजी एक दिवसीय कार्यशाळा/सहविचार सभा आयोजित करण्यात आली. सदर कार्यशाळेमध्ये उल्हासनगर शहरातील अंगणवाडी सेविका मोठया संख्येने उपस्थित होते. उल्हासगर मधील सर्व स्वयंसेवी संस्था, सामाजिक संस्था, दिव्यांग युनियन इत्यादी उपस्थित होते. सदर कार्यक्रम मा.अतिरिक्त आयुक्त श्री. जमीर लेंगरेकर यांच्या मान्यतेने घेण्यात आले. सदर कार्यक्रमामध्ये मा. उप-आयुक्त मुख्यालय श्री. अशोक नाईकवाडे, मा. उप-आयुक्त आरोग्य डॉ.सुभाष जाधव, प्रशासन अधिकारी श्री. अशोक मोरे, क्रीडा अधिकारी श्री. शांताराम चौधरी, दिव्यांग कल्याणकारी प्रमुख श्री. राजेश घनघाव , जनसंपर्क अधिकारी सौ. छाया डांगळे उपस्थित होते. कार्यशाळेकरिता ठाणे जिल्हा परिषद येथुन श्री. अनिल कु-हाडे मार्गदर्शन करत होते. त्यांनी दिव्यांग मुलांचे संगोपन कसे करायचे याबाबत पीपीटी सादर केली. कार्यक्रमाचे संपुर्ण नियोजन उल्हासनगर समग्र शिक्षा समावेशित शिक्षणचे जिल्हा/मनपा-समन्वयक सौ. संगीता लहाने यांनी केले. समग्र शिक्षा अंतर्गत विशेष शिक्षक अमोल साबळे, योगिता होलगीर, नामदेव भालेराव, हर्षदा नक्षीवाले, राजश्री पाटील, मनिषा पवार यांनी कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता सहकार्य केले. तसेच कार्यक्रमामध्ये दिव्यांग युनियनचे श्री. मनोहर साळवे, श्री. शैलेंद्र दोंदे, श्री. दिलीप मालवणकर, श्री. नारायण वाघ, करूणा लेंडे उपस्थित होते.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.